7 AUG 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापुरात रविवारी शिवाजी विद्यापीठातर्फे राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत विद्यार्थी-विद्यार्थिनींनी श्रमदानातून रंकाळा तलाव परिसर चकाचक केला. दुसऱ्या छायाचित्रात मोहिमेच्या प्रारंभी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी मार्गदर्शन केले. शेजारी डॉ. आर. व्ही. गुरव, डी. के. गायकवाड, व्ही. एन. शिंदे, रोटरी क्लब ऑफ करवीरचे एस. एन. पाटील, आदी उपस्थित होते.

## शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम : सात टन कचऱ्याचा उठाव; 'एनएसएस'च्या सुमारे आठशे स्वयंसेवकांचा सहभाग

# श्रमदानातून रंकाळा परिसर 'चकाचक'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी आणि कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजने (एनएसएस)च्या ८०० स्वयंसेवकांनी रविवारी सकाळी तीन तास श्रमदान करून रंकाळा तलाव परिसर चकाचक केला. या स्वच्छता मोहिमेत रोटरी क्लब ऑफ करवीरचे सदस्य सहभागी झाले होते. या मोहिमेअंतर्गत सुमारे सात टन कचऱ्याचा उठाव झाला.

या स्वच्छता मोहिमेस सकाळी आठ वाजता सुरुवात झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी इराणी खण, मोहिते खण, रंकाळा पदपथ पतौडी उद्यान, संध्यामठाकडील उद्यान, रंकाळा तलावाच्या बाजूने जाणारा रस्ता या परिसराची स्वच्छता केली. घनकचरा, काचा व प्लास्टिकच्या बाटल्या विद्यार्थ्यांनी गोळा केल्या. तीन तासांच्या या मोहिमेत सात टन कचरा जमा करण्यात आला. यात प्लास्टिक कचऱ्याचे स्वतंत्र संकलन करण्यात आले. रोटरी क्लबने पुरविलेल्या पोत्यांमध्ये शंभर किलो प्लास्टिक कचरा संकलित करून स्वतंत्र वाहनातून तो पुनर्प्रक्रियेसाठी पाठविण्यात आला. या क्लबच्या वतीने पर्यावरण रक्षणाबरोबरच स्वच्छतेचा संदेश देणारे वाहन मोहिमेत सहभागी केले होते. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, विद्यापीठ विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, 'एनएसएस'चे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रोटरी क्लबचे एस. एन. पाटील, विशाळ जांबळे, प्रमोद चौगुले, ज्ञानदेव केसरकर, हरेश पटेल, कुशल पटेल, मनोज कोळेकर, शीतल दुग्गे, किरण खटावकर, काशीनाथ सांगावकर, विद्यापीठातील विविध विभाग, शहरातील महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यापीठ कार्यक्षेत्रातील 'एनएसएस'चे स्वयंसेवकांनी श्रमदान केले. मोहिमेसाठी महापालिकेतर्फे दोन डंपर, एक पाण्याचा टँकर, तर विद्यापीठाचा विद्यार्थी कल्याण विभाग व 'रोटरी क्लब'ने झाडू, विळे, टोपल्या, पोती, हातमोजे, मास्क उपलब्ध करून दिले. दरम्यान, विद्यापीठाने नियमितपणे रंकाळा परिसरातील इराणी खण परिसरात स्वच्छता मोहिमा राबविल्या आहेत. दहा टन कचऱ्याचा उठाव यापूर्वी केला आहे.

### स्वच्छतेशी रक्षाबंधनाचा संकल्प करावा

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या निर्देशानुसार विद्यापीठाने रंकाळा परिसराची नियमित स्वच्छता करण्याची मोहीम हाती घेतली असल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, रंकाळ्याचे सौंदर्य अबाधित राखण्यासाठी विद्यापीठाकडून स्वच्छता मोहीम नियमितपणे राबविण्यात येईल. उद्याच्या रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या मनातच स्वच्छतेशी रक्षाबंधन करण्याचा संकल्प करावा. नागरिकांनी आपापल्या परिसरात जागरुकता दाखवून स्वच्छतेची सवय अंगी बाणवली, तर स्वच्छ भारताचे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यास वेळ लागणार नाही.

### क्रांतिदिनी महास्वच्छता अभियान

क्रांतिदिनानिमित्त बुधवारी सकाळी ८ ते ११ या वेळेत कोल्हापूर शहर परिसरातील विविध प्राचीन वास्तू, पुतळे, रस्ते व परिसरात विद्यापीठातर्फे महास्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. यामध्ये विद्यापीठ परिसरासह बिंदू चौक, शिवाजी चौक, भवानी मंडप, अंबाबाई मंदिर, गंगावेस, रेल्वे स्टेशन, एस. टी. स्टँड, दसरा चौक, व्हीनस कॉर्नर, कावळा नाका, खासबाग, गांधी मैदान आदी २८ ठिकाणच्या पुतळ्यांची स्वच्छता केली जाईल. यात शहरातील विविध महाविद्यालयांचे 'एनएसएस'चे स्वयंसेवक सहभागी होणार असल्याचे 'एनएसएस'चे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले.

7 AUG 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रंकाळा परिसरात सात टन कचऱ्याचा उठाव

## शिवाजी विद्यापीठातर्फे मोहीम : आठशे विद्यार्थ्यांसह रोटरी क्लब ऑफ करवीरचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठातर्फे रंकाळा परिसरात राबविलेल्या स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्तपणे भाग घेत सुमारे सात टन कचऱ्याचा उठाव केला. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी रंकाळा परिसर स्वच्छ केला. रोटरी क्लब ऑफ करवीरच्या सदस्यांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे रंकाळा परिसरात राबविलेल्या स्वच्छता मोहिमेत सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनी.

मोहिमेत सुमारे १०० किलो प्लास्टिक कचरा पूर्णतः स्वतंत्रपणे गोळा करण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी आठला स्वच्छता मोहिमेस प्रारंभ झाला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी इराणी खाणीसह मोहिते खाण, रंकाळा पदपथ पतौडी उद्यान, संध्यामठाकडील उद्यान, रंकाळ्याच्या बाजूने जाणारा रस्ता या परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. घनकचरा, प्लास्टिक कचरा, काचा व प्लास्टिकच्या बाटल्या विद्यार्थ्यांनी गोळा केल्या. सुमारे तीन तास राबविलेल्या या मोहिमेत सात टन कचरा गोळा केला. कोल्हापूर महापालिकेतर्फे दोन डंपर, एक पाण्याचा टँकर उपलब्ध करून देण्यात आला. विद्यापीठाचा विद्यार्थी कल्याण विभाग व रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्याकडून झाडू, विळे, टोपल्या, पोती, हातमोजे व मास्कची उपलब्धता करण्यात आली.

विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रोटरी क्लबचे एस. एन. पाटील, विशाळ जांबळे, प्रमोद चौगुले, ज्ञानदेव केसरकर, हरेष पटेल, कुशल पटेल, मनोज कोळेकर, शीतल दुग्गे, किरण खटावकर, काशीनाथ सांगावकर यांच्यासह शहरातील विविध महाविद्यालयांचे 'एनएसएस'चे समन्वयक यांनी परिश्रम घेतले.

### क्रांतिदिनी महास्वच्छता अभियान

क्रांतिदिनी महास्वच्छता अभियान ९ ऑगस्टला सकाळी आठ ते अकरा या वेळेत कोल्हापूर शहर परिसरातील विविध प्राचीन वास्तू, पुतळे, रस्ते व परिसरात राबविण्यात येणार आहे. यात विद्यापीठ परिसरासह बिंदू चौक, शिवाजी चौक, भवानी मंडप, महालक्ष्मी मंदिर, गंगावेस, रेल्वे स्थानक, बस स्थानक, दसरा चौक, व्हीनस कॉर्नर, कावळा नाका, खासबाग, गांधी मैदान आदी ठिकाणच्या पुतळ्यांची स्वच्छता करण्यात येणार आहे, अशी माहिती एनएसएस समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी दिली.

### रोटरी क्लबतर्फे संदेश देणारे वाहन

'रोटरी'मार्फत पुरविण्यात आलेल्या पोत्यांमध्ये निव्वळ प्लास्टिक कचरा संकलित करून स्वतंत्र वाहनातून तो पुनर्प्रक्रियेसाठी पाठविण्यात आला. रोटरी क्लबतर्फे पर्यावरण रक्षणाबरोबरच स्वच्छतेचा संदेश देणारे वाहनही मोहिमेत सहभागी होते.

- 7 AUG 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठतर्फे रंकाळा परिसराची स्वच्छता मोहीम

## राष्ट्रीय योजनेच्या आठशे विद्यार्थ्यांचा सहभाग : सात टन कचरा जमा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठतर्फे रंकाळा परिसराची स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे (एन.एस.एस.) आठशे विद्यार्थी सहभागी झाले होते. रोटरी क्लब ऑफ करवीरच्या सदस्यांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. मोहिमेत १०० किलो प्लॅस्टिक कचरा गोळा करण्यात आला.



कोल्हापूर : रंकाळा परिसराची स्वच्छता करताना विद्यार्थिनी.

विद्यार्थ्यांनी इराणी खणीसह मोहिते खण, रंकाळा पदपथ पतौडी उद्यान, संध्यामठ येथील उद्यान तसेच रंकाळ्याच्या बाजूने जाणारा रस्ता या परिसरात स्वच्छता मोहिम राबविली. घनकचरा, प्लॅस्टिक कचरा, काचा व प्लॅस्टिकच्या बाटल्या विद्यार्थ्यांनी जमा केल्या. तीन तास राबविलेल्या या मोहिमेत सात टन कचरा गोळा करण्यात आला. महानगरपालिकेच्या वतीने २ डंपर, एक पाण्याचा टँकरची सोय करण्यात आली होती. विद्यापीठाचा विद्यार्थी कल्याण विभाग आणि रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्याकडून झाडू, विळे, टोपल्या, पोती, हातमोजे व मास्क पुरवण्यात आले. विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रोटरी क्लबचे एस. एन. पाटील, विशाळ जांबळे, प्रमोद चौगुले, ज्ञानदेव केसरकर, हरेष पटेल, कुशल पटेल, मनोज कोळेकर, शीतल दुग्गे, किरण खटावकर, काशीनाथ सांगावकर आदींसह विविध महाविद्यालयांचे एन.एस.एस.चे समन्वयक यांनी परिश्रम घेतले.

### परिसरातील नागरिकांमध्येही स्वच्छता ठेवावी

शिवाजी विद्यापीठाने नियमितपणे रंकाळा परिसर व इराणी खण परिसरात स्वच्छता मोहीम राबविली आहे. दहा टन भरेल इतका कचरा या परिसरातून यापूर्वी उचलण्यात आला होता. सध्या येथील कचऱ्याचे व प्लॅस्टिक कचऱ्याचेही प्रमाण कमी झाल्याचे आढळून आले. नागरिकांनी आपापल्या परिसरात स्वच्छता ठेवली, तर स्वच्छ भारताचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल.

– कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

### इराणी खण परिसरात कचऱ्याचे प्रमाण होतेय कमी

राज्यपाल चे. विद्यासागर राव यांच्या निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठाने रंकाळा परिसराची नियमित स्वच्छता करण्याची मोहीम हाती घेतली आहे. रंकाळ्याचे सौंदर्य अबाधित राखण्यासाठी विद्यापीठाकडून स्वच्छता मोहिम नियमितपणे राबविण्यात येईल.

### क्रांतिदिनी स्वच्छता अभियान

९ ऑगस्ट रोजी क्रांतिदिनानिमित्त सकाळी ८ ते ११ या वेळेत कोल्हापूर शहर परिसरातील विविध प्राचीन वास्तू, पुतळे, रस्ते व परिसरात शिवाजी विद्यापीठातर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. यावेळी शहरातील २८ ठिकाणच्या पुतळ्यांची स्वच्छता केली जाणार आहे. यात शहरातील विविध महाविद्यालयांचे एनएसएसचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

– डॉ. डी. के. गायकवाड, एनएसएस समन्वयक

- 7 AUG 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केले स्वच्छतेशी रक्षाबंधन

▸▸ कोल्हापूर टाइम्स टीम

**शिवाजी विद्यापीठातर्फे रंकाळा स्वच्छता मोहीम**

शिवाजी विद्यापीठातर्फे रविवारी सकाळी रंकाळा परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे आठशे विद्यार्थ्यांनी रंकाळा परिसर लखलखीत केला. रोटरी क्लब ऑफ करवीरच्या सदस्यांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. मोहिमेत सात टन कचरा एकत्रीत करण्यात आला. स्वतंत्रपण सुमारे १०० किलो प्लास्टिक कचरा जमा करण्यात आला.



रंकाळा व इराणी खण परिसरात राबवण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.

विद्यार्थ्यांनी इराणी खणीसह मोहिते खण, रंकाळा पदपथ, पतौडी उद्यान, संध्यामठाकडील उद्यान तसेच रंकाळ्याच्या बाजूने जाणारा रस्ता परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. घनकचरा, प्लास्टिक कचरा, काचा व प्लास्टिकच्या बाटल्या विद्यार्थ्यांनी गोळा केल्या. सुमारे तीन तास राबविलेल्या या मोहिमेत सात टन कचरा गोळा झाला.

मोहिमेच्या उदघाटनावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या निर्देशानुसार विद्यापीठाने स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. रंकाळा तलावाचे सौंदर्य अबाधित राखण्यासाठी विद्यापीठाकडून स्वच्छता मोहीम नियमितपणे राबविण्यात येईल. उद्याच्या रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या मनातच स्वच्छतेशी रक्षाबंधन करण्याचा संकल्प सोडल्यास संपूर्ण देश स्वच्छ होण्यास वेळ लागणार नाही.'

विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, एनएसएस समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रोटरी क्लबचे एस. एन. पाटील, विशाळ जांबळे, प्रमोद चौगुले, ज्ञानदेव केसरकर, हरेष पटेल, कुशल पटेल, मनोज कोळेकर, शीतल दुग्गे, किरण खटावकर, काशीनाथ सांगावकर यांच्यासह शहरातील विविध महाविद्यालयांचे एनएसएसचे समन्वयक यांनी स्वच्छता अभियान यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.



■ स्वच्छता प्रबोधनासाठी पे सायकल





### प्लास्टिक कचऱ्याचे स्वतंत्र संकलन

मोहिमेत प्लास्टिक कचऱ्याचे स्वतंत्र संकलन करण्यात आले. रोटरीमार्फत पुरविण्यात आलेल्या पोत्यांमध्ये निव्वळ प्लास्टिक कचरा संकलित करून स्वतंत्र वाहनातून तो पुनर्प्रक्रियेसाठी पाठविला. रोटरी क्लबच्यावतीने पर्यावरण रक्षणाबरोबरच स्वच्छतेचा संदेश देणारे वाहनही मोहिमेत सहभागी होते.

### इराणी खण परिसरात कमी कचरा

विद्यापीठाने इराणी खण परिसरात नियमित स्वच्छता मोहीम राबविली आहे. यापूर्वी दहा टन कचरा या परिसरातून जमा केला होता. मात्र आजच्या मोहिमेत या परिसरातील कचऱ्याचे व प्लास्टीक कचऱ्याचेही प्रमाण कमी झाल्याचे आढळून आले. नागरिकांनी आपापल्या परिसरात अशीच जागरुकता दाखवल्यास परिसर स्वच्छ राहण्यास मदत होईल.

### क्रांतिदिनी महास्वच्छता अभियान

नऊ ऑगस्ट रोजी क्रांतिदिनानिमित्त सकाळी ८ ते ११ या वेळेत कोल्हापूर शहर परिसरातील विविध प्राचीन वास्तु, पुतळे, रस्ते व परिसरात शिवाजी विद्यापीठाच्यावतीने महास्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठ परिसरासह बिंदू चौक, शिवाजी चौक, भवानी मंडप, महालक्ष्मी मंदिर, गंगावेस, रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टँड, दसरा चौक, व्हीनस कॉर्नर, कावळा नाका, खासबाग, गांधी मैदान आदी २८ ठिकाणच्या पुतळ्यांची स्वच्छता करण्यात येणार आहे.

E 7 AUG 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रंकाळा स्वच्छता मोहिमेत सात टन कचऱ्याचा उठाव

## शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या आठशे विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातर्फे रविवारी सकाळी रंकाळा परिसरात राबवण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एन. एस. एस.) सुमारे आठशे विद्यार्थ्यांनी रंकाळा परिसर चकचकीत केला. रोटरी क्लब ऑफ करवीरच्या सदस्यांनीही या मोहिमेत सहभाग घेतला. मोहिमेंतर्गत सुमारे सात टन कचऱ्याचा उठाव करण्यात आला. विशेष म्हणजे यंदा प्लास्टिक कचऱ्याची पूर्णतः स्वतंत्र वेचणी करण्यात आली. मोहिमेत सुमारे १०० किलो प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रंकाळा परिसर स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी आठ वाजता स्वच्छता अभियानास सुरुवात झाली. कुलगुरू डॉ. शिंदे भाषणात म्हणाले, महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठाने रंकाळा परिसराची नियमित स्वच्छता करण्याची मोहीम हाती घेतली आहे. रंकाळ्याचे सौंदर्य अबाधित राखण्यासाठी विद्यापीठाकडून स्वच्छता मोहीम नियमितपणे राबवण्यात येईल. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या मनातच स्वच्छतेशी रक्षाबंधन करण्याचा संकल्प सोडल्यास संपूर्ण देश स्वच्छ होण्यास वेळ लागणार नाही.

▶▶ पान २ वर

### क्रांतिदिनी महा-स्वच्छता अभियान

९ ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त सकाळी आठ ते अकरा या वेळेत कोल्हापूर शहर परिसरातील विविध प्राचीन वास्तू, पुतळे, रस्ते व परिसरात शिवाजी विद्यापीठाच्या वतीने महास्वच्छता अभियान राबवण्यात येणार आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठ परिसरासह बिंदू चौक, शिवाजी चौक, भवानी मंडप, अंबाबाई मंदिर, गंगावेस, रेल्वे स्टेशन, एस. टी. स्टँड, दसरा चौक, व्हीनस कॉर्नर, कावळा नाका, खासबाग, गांधी मैदान आदी २८ ठिकाणच्या पुतळ्यांची स्वच्छता करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 AUG 2017

पुण्यनगरी

# रंकाळा स्वच्छता मोहिमेत सात टन कचऱ्याचा उठाव

यावेळी विद्यार्थ्यांनी इराणी खणीसह मोहिते खण, रंकाळा पदपथ पतौडी उद्यान, संध्यामठाकडील उद्यान तसेच रंकाळ्याच्या बाजूने जाणारा रस्ता या परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. घनकचरा, प्लास्टिक कचरा, काचा आणि प्लास्टिकच्या बाटल्या विद्यार्थ्यांनी गोळा केल्या. सुमारे तीन तास राबवलेल्या या मोहिमेत सुमारे सात टन कचरा गोळा करण्यात आला. कोल्हापूर महानगरपालिकेतर्फे दोन डंपर, एक पाण्याचा टँकर उपलब्ध करून देण्यात आले. विद्यापीठाचा विद्यार्थी कल्याण विभाग आणि रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्याकडून झाडू, विळे, टोपल्या, पोती, हातमोजे आणि मास्क आदींची उपलब्धता करण्यात आली.विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रोटरी क्लबचे एस. एन. पाटील, विशाळ जांबळे, प्रमोद चौगुले, ज्ञानदेव केसरकर, हरेश पटेल, कुशल पटेल, मनोज कोळेकर, शीतल दुग्गे, किरण खटावकर, काशीनाथ सांगावकर यांच्यासह शहरातील विविध महाविद्यालयांचे एन. एस. एस.चे समन्वयक यांनी स्वच्छता अभियान यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. विद्यापीठातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांबरोबरच कोल्हापूर शहरातील विविध महाविद्यालयांसह सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांतील सुमारे आठशे एनएसएस स्वयंसेवकांनीही स्वच्छता अभियानात सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
7 AUG 2017 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK students clean Rankala lake area

## 8 Tonne Of Garbage Collected

TIMES NEWS NETWORK

TOI



The students cleaned Rankala footpath, Patoudi garden, Irani quarry along with Mohite quarry during the drive

**Kolhapur:** Around 800 students from Shivaji University, Kolhapur (SUK) participated in the Rankala lake cleanliness drive on Sunday and gathered around 8 tonne of garbage.

The students cleaned Rankala footpath, Patoudi garden, Irani quarry along with Mohite quarry during the drive.

State governor C Vidyasagar Rao in April 2015 had appealed to SUK to adopt the Mahalaxmi temple or Rankala Lake and start cleaning them for the upliftment of the students through their participation.

Following this, the university took up the cleanliness drive at Rankala Lake area on a regular basis and Sunday's drive was part of it.

Addressing a young gathering before the drive, Devanand Shinde, vice-chancellor of SUK said, "Following the instructions of the state governor C Vidyasagar Rao, we have initiated the work of cleaning Rankala Lake. Our aim is to ensure that the cleanliness drive will help maintain the beauty of the lake and the youth participation in the backdrop of Raksha bandhan festival will help spread the message of cleanliness among all people. This will ultimately help in keeping our country clean."

The youth belonging to various colleges from Kolhapur, Sangli and Satara districts and members of National Service Scheme (NSS) gathered at Rankala Lake area on Sunday morning and started cleaning by removing garbage from the area. They cleaned the roads and footpaths leading to Rankala Lake. Special measures were taken during the drive. Segregation of plastic garbage from other types of garbage was done during the process. Plastic including polythene bags weighing 100 kg was collected on Sunday, informed an official from the university.

"We are planning to launch a special cleanliness drive in the city on August 9. We will clean the statues and surrounding areas in the city including Shivaji University, Bindu chowk, Shivaji chowk, Bhawani Mandap, Mahalaxmi temple, Gangavesh, Railway station, ST stand, Dasara chowk, Venus corner, Kawala Naka, Khasbag and Gandhi maidan. We have identified 28 such spots in the city that will be cleaned on August 9," the official said.

7 AUG 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकडून रंकाळा परिसरात स्वच्छता मोहीम

## आठशे विद्यार्थ्यांनी केला सात टन कचरा जमा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

रंकाळा तलाव परिसराची आजची सकाळ स्वच्छतादूतांनी गजबजली. हातात फावडं, पाट्या, खुरपे घेऊन जवळपास आठशे विद्यार्थी कचरा गोळा करत होते. 'साथी हात बढाना'सारखी प्रेरक गाणी गुणगुणत बघताबघता विद्यार्थ्यांनी गोळा केलेल्या कचऱ्याने डंपर भरले. परिसर चकाचक दिसू लागला. तीन तासांहून अधिक कालावधीत श्रमदान करत सुमारे सात टन कचरा आणि शंभर किलो प्लास्टिक गोळा करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश होता. या मोहिमेत रोटरी करवीर चॅरिटेबल ट्रस्ट यांचा सक्रिय सहभाग होता. या स्वच्छता मोहिमेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, एनएसएस समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रोटरीचे एस. एन. पाटील, विशाल जांभळे, प्रमोद चौगुले, ज्ञानदेव केसरकर, हरेष पटेल, कुशल पटेल, मनोज कोळेकर, शीतल दुग्गे, किरण खटावकर, काशिनाथ सांगावकर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व रोटरी करवीर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने रविवारी रंकाळा परिसर स्वच्छता मोहिमेत विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. यावेळी कचरा गोळा करताना विद्यार्थी.**
**(छाया : तय्यब अली)**

**क्रांती दिनी महास्वच्छता अभियान**

९ ऑगस्टला क्रांतीदिनी सकाळी आठ ते अकरा या वेळेत शहर व परिसरातील प्राचीन वस्तू, पुतळे, रस्ते, वास्तू परिसर स्वच्छ करण्यात येणार आहे.